REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018

# हलरसंग कुडल येथील शैव – वैष्णव यांच्यातील एकरूपता दाखवणारी शिल्पे

डॉ. संजय गायकवाड
विभाग प्रमुख, एम.एच. महाडिक कला व वाणिज्य महाविद्यालय, मोडनिंब.

**प्रस्तावना :**



सोलापूर जिल्ह्यातील परिसराचा इतिहास प्राचीन असून प्राचीन काळी याचा 'कुंतल देशात' समावेश होत होता. या प्रदेशावर अनुक्रमे सातवाहन, माणपूरचे राष्ट्रकुट, वाकाटक, बदामीचे चालुक्य, कलचुरी, यादव राजघराण्यांनी क्रमशः राज्य केले. पण अपुरा पाणी पुरवठा, खनिज संपत्ती आणि पर्वतीय रांगांचा अभाव या प्रतिकुल भौगोलिक परिस्थितीमुळे सोलापूरला राजधानीचा मान कधीही मिळाला नाही.

सोलापूर जिल्ह्यातून भीमा, सीना, नीरा, माण, बोरी, हरणा, भोगावती इत्यादी नद्या वाहत असून त्यातील भीमा ही सर्वात मोठी व मुख्य नदी आहे. भीमेला उजव्या बाजूने नीरा व माण या नद्या संगम (माळशिरस) व सरकोली (पंढरपूर) येथे येऊन मिळतात. तर डाव्या बाजूने सीना नदी हत्तरसंग कुडल (ता. दक्षिण सोलापूर) येथे येऊन मिळते.[०१, पृ.क्र.०६ ते ०९]

हत्तरसंग कुडलसंगम हे ठिकाण सोलापूर शहराच्या दक्षिण दिशेला आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यात हे ठिकाण येत असून मुंबई-विजापूर या महामार्ग क्र. १३ वर सोलापूर पासून फक्त ४० कि.मी. अंतरावर हत्तरसंग कुडलसंगम हे गाव आहे. हा संगम हत्तरसंग या गावाजवळ झाल्याने या ठिकाणाला हत्तरसंग कुडल असे म्हटले जाते. कानडी भाषेत 'कुडल' म्हणजे संगम. त्यावरुन हे ठिकाण कुडलसंगम म्हणून ओळखले जाते. सोलापूर जिल्ह्यातील प्रमुख नदी भीमा हिला या ठिकाणी डाव्या बाजूच्या प्रवाहाने सीना नदी मिळते व येथे संगम झालेला आहे. भीमा नदी ही महाराष्ट्र व कर्नाटकच्या सीमेवर आहे.[०२, पृ.क्रं. ०१] या ठिकाणी श्री संगमेश्वर, श्री महादेव, श्री हरिहरेश्वर, श्री महाबली हनुमान इत्यादी मंदिरे आढळतात. या मंदिरात शैवपंथीय, वैष्णवपंथीय शिल्पाबरोबरच काही हरिहरेश्वर प्रतिक शिल्पे आढळतात.

इ.स. ६०० ते इ.स. १२०० या काळात धार्मिक स्थापत्य व शिल्पकला कळसाला पोहचली होती. भव्य व कलात्मक मंदिरे उभारणीच्या बाबतीत स्पर्धा लागल्याने शेकडो, हजारो कुशल कारागिर दगड, ब्रान्झ व इतर धातूंपासून सुंदर निर्मिती करण्यासाठी योजना केली जात होती.[०३, पृ.क्र. १७१]

भारतीय मूर्तीकलेचा उगम देवपूजेतून झाला. प्राचीन काळातल्या बहुतेक मूर्ती देवतांच्या असून त्या पूजेच्या उद्देशाने बनविलेल्या दिसतात.[०४, पृ.क्र. ४४४] मूर्तीच्या चेहऱ्यावरील भावभावनातून आंतरिक भावनांचे प्रतिबिंब स्पष्ट करण्यात येते. दैवी व आध्यात्मिक भावना लौकीक माध्यमाद्वारे अभिव्यक्त करण्यात आल्या आणि मूर्तीच्या शरीरसौष्ठत्वाद्वारे त्या देवतेचे वेगळेपण व वैशिष्ट्ये प्रतिबिंबीत करण्यात आले.[०५, पृ.क्र. १५४]

निर्गुणाला सगुणाच्या सीमेत बांधून टाकणे, कोणेही न पाहिलेल्या मानव प्रतिमेचे रुपाने साकार करुन सर्वांच्या समोर वंदनीय व पूजनीय म्हणून उपस्थित करण्यात अनेक प्रयत्न करावे लागले.[०६, पृ.क्र. २४]

शिल्पकारात धैर्य, संयम, एकाग्रता, प्रतिभाशाली, हस्तकौशल्य असल्यानेच शिल्पकलेत शृंगार, हास्य, करुण, शांत, अद्‌भुत या भावरसाबरोबरच वीर, रौद्र, बीभत्स आणि भयानक इत्यादी भावभावना प्रतिमेत उतरवत असतो. मानवाच्या स्थायी भावभावना आपण मूर्तीवर आरोपित करतो.[०७, पृ.क्र. १८]

भारतीय संस्कृती आणि जीवनप्रणाली शिल्पांमधून साकार करण्याचे श्रेय शिल्पकारांना आहे. शिल्पकारांची शिल्पालिपी कमलकालिकेच्या शालीन भाषेची आहे. भारतीय कलाकारांनी सौंदर्यवादी दृष्टीकोन व निसर्गातील विविध तत्त्वांना कलेत स्थान देवून मूर्तीकलेच्या आविष्कारातून आदर्शवादाची जाणीव करुन दिली.[(०५, पृ.क्र. १५६)]

कश्यप व अगस्ती हे महान मुर्तीशास्त्रज्ञ समजले जातात. कश्यप यांच्या 'अंशुमदभेद' या ग्रंथात व अगस्ती यांच्या 'आगस्तीय सकलाधिकार' या ग्रंथात मूर्तीशास्त्राविषयी माहिती मिळते. [(०४, पृ.क्र. ४४५)]

भारतीय संस्कृतीमध्ये शिल्पशास्त्राचे विश्वकर्मा आणि महर्षी शुक्राचार्य हे आद्य प्रवर्तक आहेत. कोणत्याही मूर्तीच्या अथवा कलाशिल्पाच्या घडणावळीत तालमानला फार महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. त्यांच्या परिमाणांच्या किंवा मोजमापाच्या आधारानेच पाषाणखंडातून मूर्ती किंवा कलाशिल्प साकार केले जाते. शिल्पसंहितेचे ठरवून दिलेली परिमाणे अथवा मोजमापे, हाताची मूठ आणि अंगुली (बोटे) अशी नैसर्गिक असतात. [(०७, पृ.क्र. ४०)]

मूर्तीकलेची माहिती मत्स्यपुराण, अग्निपुराण, स्कंदपुराण, पद्मपुराण, लिंगपुराण, भविष्यपुराण, विष्णुधर्मोत्तर या ग्रंथात मूर्तीशास्त्र आणि मूर्तीपुजाची माहिती बृहदसंहिता या ग्रंथात, मूर्तीकलेची माहिती सुप्रेभदायम, वैश्वानसागम् अंशुभदभेदागम या ग्रंथात, मूर्ती विज्ञानाची माहिती मानसार, सकलाधार, शिल्परत्न, मयमत या ग्रंथात आणि दक्षिण भारतीय मूर्तीकलेची माहिती समरांगणसुत्रधार, विश्वकर्मावतार या ग्रंथात मिळते. [(०५, पृ.क्र. १५७-१५८)]

## हरिहरेश्वर प्रतिक शिल्पे :

- **विश्वरुप शिवलिंग :-**

येथील उत्खनन करताना या मंदिराच्या प्राकारातील माती व दगडाचा गाळ काढत असतांना एक मनोहर व असामान्य शिल्प मिळाले आहे. त्याचा आकार लिंगासारखा आहे. या शिलेचा परीघ ४ मी. असून शिलेचे वजन साडेचार टन आहे. शिवपिंडीच्या स्वरुपात असल्याने या शिल्पाच्या वरच्या मध्यापासून ५२ सें.मी. पर्यंत रिकामी जागा सोडली आहे. राहिलेल्या भागावर वरुन तळापर्यंत वर्तुळाकार किरीट किंवा मुकूट घातलेल्या शिवदेवतेचे मुखवटे उठाव शिल्पांनी दाखवलेले आहे. उठाव पद्धतीने कोरलेल्या या शिल्पांच्या नऊ आडव्या ओळी आढळतात.

या वैशिष्ट्यपूर्ण शिवलिंगातील शिलेतील वरच्या मध्यापासून काही अंतरावर १ ल्या ओळीपासून ९ व्या ओळीपर्यंत प्रथमतः उठावदार शिवाची मुखवटे काढलेले आहेत. या मुखवट्याची उंची १.५ इंच ते ५.५ इंच पर्यंत वाढलेली आहे. त्यामुळे प्रत्येक मुखवट्याच्या मध्ये ०.५ इंच इतका फरक पडलेला आहे. प्रत्येक आडव्या ओळीत एकाच आकाराचे ४० मुखवटे असून या ओळी ज्याप्रमाणे खालील बाजूला जातात त्याप्रमाणे मुखवट्याचा आकार मोठा झाला असला तरी कलाकाराने त्या ओळीतही ४० उठावदार मुखवटे काढलेले आहेत. पहिल्या चार ओळीतील मुखवटे थोड्याफार प्रमाणात काळाच्या ओघात अस्पष्ट झाले आहेत. या मुखवट्यातील ज्या ज्या ठिकाणी किरीट आहे तेथे नाग स्पष्टपणे दिसतो. कलाकाराने ८ व्या व ९ व्या ओळीतील मुखवट्याचा वापर करुन शिवाच्या उभ्या व बसलेल्या मूर्ती आहेत. उभ्या मूर्तीपैकी एक मूर्ती हरिहरची आहे. उभ्या मूर्ती ५३ सें.मी. उन्मानच्या असून व प्रमाण १५ सें.मी. आहे आणि बैठ्या मूर्ती ३४ सें.मी. उन्मानच्या व प्रमाण २३ सें.मी. इतके आहे. उभ्या मूर्तीची आयुधे त्याच आडव्या ओळीतील मुखवट्यावर काढलेली आहेत. सर्व उभ्या मूर्ती एक समान उंचीच्या व आकाराच्या असून सर्व मूर्ती त्रिभंगी अवस्थेत उभ्या आहेत. डोक्यावर किरीट, कानात कर्णकुंडल, गळ्यात माळ, कमरेला कमरपट्टा, पायापर्यंत ओघळता हार व पायात तोडे या अशा विविध अलंकारांनी या मूर्ती सुशोभित केल्या आहेत. उभ्या मूर्तीपैकी एक मूर्ती हरिहरची असून ती शिव-विष्णूचा अवतार मानली जाते. मूर्तीचा डावा भाग हरिचा म्हणजेच विष्णूचा तर उजवा भाग हराचा म्हणजेच शिवाचा आहे. हर (शिव) मूर्तीच्या मस्तकावर रुद्राक्षाचा मुकूट आहे व हातात त्रिशूल व सर्प आहे. हरि (विष्णू) च्या हातात कमळ व गदा आहे, कानात मकरकुंडल आहे. शिवाच्या हातातील आयुध त्रिशूल, डमरु व सर्प हे स्पष्टपणे सर्व मूर्तीवर दिसतात. ९ व्या ओळीतील शिवाच्या मूर्ती बैठ्या अवस्थेतील असून त्या पद्मासन घालून नाकाग्री दृष्टी असलेल्या या मूर्तींना चार हात असून खालील दोन हात गुडघ्यावर असून ते समोरील बाजूस उघडे आहेत. वरच्या उजव्या हातामध्ये त्रिशूल आणि डाव्या हातात सर्प आहे, डोक्यावरील किरीट स्पष्टपणे दिसतो, कानात कर्णकुंडल आढळतात.

- **लक्ष्मी :-**

श्री हरिहरेश्वर मंदिरात प्रवेश करताना समोरच एक अर्धमंडपात एकाच अखंड शीलेवरती दोन्ही बाजूला उठावमूर्ती कोरलेल्या आहेत. त्या लक्ष्मी व भैरवीच्या मूर्ती आहेत. या मूर्तीचे मुख पश्चिमेकडे आहे. लक्ष्मीची मूर्ती अचल स्वरुपातील आहे. त्रिभंगी अवस्थेतील स्थानक स्वरुपातील आहे. या मूर्तीचे परिमाण आढीव स्वरुपात आहे. या मूर्तीचे प्रमाण १.९ फूट तर उन्मान ४.५ फूट आहे. ही मूर्ती उठावमूर्ती असून अलंकारानी व वेशभूषेने परिपूर्ण स्वरुपाची आहे.

मूर्तीचा उजवा हात आणि डावा हात कोपऱ्यापासून तुटलेला आहे. तरीही इतर अवयवांवरुन या शिल्पाची परिपूर्णता व नाविण्य स्पष्टपणे जाणवते.

अंगावरील उरुदाम किंवा उपवस्त्र डाव्या हाताच्या खांद्यावरुन पाठीमागे घेवून उजव्या हाताच्या दंडाजवळून घेतलेले दिसते. कदाचित ते उरुदाम उजव्या हातावर गुंडाळलेले असावे. मात्र सध्याला तो हात तुटलेला आहे. मुक्तदाम किंवा अधोवस्त्र कमरेला गुंडाळून त्याच्या घोळदार चुन्या पायापर्यंत सोडलेल्या आहेत. या चुन्या अतिशय अरुंद स्वरुपाच्या काढलेल्या आहेत. शिल्पाच्या चेहऱ्यावरील मुकुट स्पष्ट दिसत असल्याने या मुकुटावरुन हे लक्ष्मीचे शिल्प आहे हे स्पष्ट होते. डोक्यावरती विष्णुसारखा उभा आकाराचा किरीट त्याच्या डाव्या बाजूला शंख असून तो सध्याला अस्पष्ट स्वरुपात दिसत आहे. किरीटाचा आकार गोलाकार असून कपाळापासून वरती निमूळता होत गेला आहे. अशा प्रकारचे किरीट गुप्त, चालुक्य व पल्लव काळात आढळतात. किरीटच्या खालच्या बाजूस समोर प्रथम एक छोटासा गोट असून त्यानंतर त्यावर जाड, बाह्यउठावातील अर्धवर्तुळाकार गोट दिला आहे. त्याला ठराविक अंतरावर नाजूक उभ्या रेषांनी सुशोभित केले आहे. शिल्पाच्या उजव्या कानातील सर्प कुंडल स्पष्टपणे दिसत आहे. ते लंबगोलाकार असून इतर शिल्पातील कर्णकुंडलापेक्षा आकार मोठा आहे. डाव्या बाजूचा कान तुटलेला आहे. गळ्यामध्ये जाड स्वरुपातील गोप आहे. त्याला हिक्कासूत्र असे म्हणतात. त्याखाली असणारा गोप उदरावर दाखविला असून तोही आकाराने जाड आहे. त्याला हारसूत्र असे म्हणतात. दंडाचे केयूर अलंकार असून त्याचेही पाच पदर दाखवले आहेत. कमरेला कटीसूत्र आढळते. हे कटीसूत्र जवळ जवळ आठ पदरी आहे. यालाच मेखला असे म्हणतात. त्याखाली उरुदाम असून त्याच्या दोन माळा लटकत आहेत. त्याखाली मुक्तमाळ व त्याखाली वनमाळ काढलेली आहे. पायामध्ये जाड आकाराचे पादवलय आहे. अशा तऱ्हेने हे शिल्प अलंकाराने जास्तीत जास्त सुशोभित केलेले दिसते.

- **भैरवी :-**

श्री हरिहरेश्वर मंदिरातील अर्धमंडपातील अखंड शिलेवरती मुख गर्भगृहाकडे आहे. या मूर्तीच्या गळ्यातील नरमुंड माळेवरुन ती भैरवीची मूर्ती आहे हे स्पष्ट होते. ही मूर्ती अचल स्वरुपातील त्रिभंगी अवस्थेतील स्थानक स्वरुपातील आहे. या मूर्तीचे परिमाण आढीव स्वरुपात आहे. या मूर्तीचे प्रमाण १.९ फूट तर उन्मान ४.५ फूट आहे. ही मूर्ती उठावमूर्ती असून अलंकारानी व वेशभूषेने परिपूर्ण स्वरुपाची आहे. या शिल्पातील मुकुट, पूर्ण उजवा हात, डाव्या हाताचा पंजा तुटलेला आहे. तरीही इतर अवयवांवरुनही शिल्पांची परिपूर्णता व नाविण्य स्पष्टपणे जाणवते. अंगावरील उपवस्त्र (उरुदाम) पारदर्शक दाखवले आहे. ते खांद्यावरुन समोर घेवून दोन्ही हाताच्या खालून पाठीमागे टाकले आहे तर अधोवस्त्र (मुक्तदाम) कमरेला गुंडाळून त्याची घोळदार चुन्यासमोर घेऊन त्याची कमरेच्या मधोमध गाठ बांधून ती पायापर्यंत लोंबत सोडली आहे. वस्त्राच्या चुन्या इतक्या स्पष्टपणे दिसतात जणू एखादे वस्त्रच समोर आहे का असे वाटते.

शिल्पावरील चेहऱ्यावरील मुकुटाचा भाग तुटलेला असल्याने मुकुट स्पष्ट होत नाही. मात्र कानात सुर्यवृत गोलाकार कुंडल स्पष्टपणे दिसतात. हातातील केयूर आकर्षक आहे. गळ्यात गोपासारख्या दोन माळा असून त्या हिक्कासूत्र व हारसूत्र या नावाने ओळखल्या जातात. कमरेला साधे कटीसूत्र दिसते. त्याखाली उरुदाम असून त्याला एकत्र माळ लटकत आहे. तर हातात व पायात हस्तवलय व पादवलय दिसते. दोऱ्यासारख्या किंवा गोपासारख्या पादवलयाला मंजीर असे म्हणतात. सर्वात वैशिष्ट्यपूर्ण म्हणजे गळ्यात नरमुंडाची माळ पायापर्यंत आढळते. या नरमुंडाच्या माळेत ११ नरमुंड दिसतात. एकूणच ही मूर्ती शिल्पकलेच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे.

- **मुखमंडपाच्या कक्षासनासमोरील गणपती :-**

श्री हरिहरेश्वर मंदिराच्या अर्धमुखमंडपाच्या डाव्या व उजव्या बाजूला मुखमंडपाच्या समोरील भिंतीला पश्चिमाभिमुख तोंड करुन उभ्या स्वरुपाच्या दोन गणपतीची शिल्पे आढळतात. ही शिल्पे मुखमंडपाच्या कक्षासनाच्या समोरील बाजूस आहेत. दोन्ही शिल्पांमध्ये सारखेपणा दिसतो. ही शिल्पे श्री हरिहरेश्वर मंदिराच्या उपपीठापासून एक फूट उंचीवर पहावयास मिळतात. ही दोन्हीही शिल्पे चित्रार्ध स्वरुपात आहेत. ही गणपतीची शिल्पे प्रत्यालिढ आसनात आहेत. ही शिल्पे स्थानक प्रकारात असून ती त्रिभंगी अवस्थेत आहेत. ही शिल्पे चर्तुभूज स्वरुपाची आहेत. उजवीकडील क्रमांक १ चा खालील हात दंडहस्त मुद्रेत आहेत. या हाताखाली गदेचे गोलाकार शीर्ष असून त्यावर हस्त धरुन ठेवला आहे. त्यामुळे गदेचे गोलाकार शिल्पाच्या उजवीकडे तिरकी करुन तिचे खालील टोक जमिनीवर ठेवले आहे. या शिल्पाचा उजवीकडील दुसऱ्या हातात त्रिशूल आहे. तर डावीकडील वरील हात शरीरापासून थोडासा बाजूला घेवून हाताचा पंजा वरच्या दिशेला ठेवला असून त्यावर गोलाकार आकारात शिवलिंग काढलेली आहे. डावीकडील दुसऱ्या हातात मोदकाचे भांडे असून त्यामध्ये एकावर एक मोदक ठेवलेले आहेत. या गणेश शिल्पासाठी पुल्लिंगी स्वरुपाचा शिलाखंड वापरला आहे.

दोन्हीही गणेश शिल्पाचा उजवा पाय थोडासा पुढे घेवून गुडघ्यात किंचीतसा वाकवलेला आहे व पायाचा पंजा बाहेरील बाजूस तिरका केला आहे. गणपतीचा चेहरासमोर दाखवून त्याची सोंड डावीकडे वळवलेली आहे. ही सोंड वरुनच वामावर्त होवून मोदकापर्यंत दाखवलेली आहे. शरीरातील बैठवपणा कमी पहावयास मिळतो. येथील पोट कमी सुटलेले दाखवले आहे. हाताची, पायाची रचनाही सर्वसामान्य स्वरुपात आहे. गणपतीचे अधोवस्त्र तलम स्वरुपाचे दाखवले असून ते कमरेला गुंडाळून त्याची गाठ समोर सोडली आहे. शिल्पकाराने या वस्त्राच्या समोरील बाजूस येणाऱ्या घड्या रेखीवतेने व सहजतेने दाखवून कलेची परिपूर्णता स्पष्ट केली आहे. उपवस्त्र स्पष्ट होत नाही. डोक्यावरती उभ्या स्वरुपात पिरॅमिडसारखा मुकूट दाखवला असून त्याला कपाळाजवळ गोलाकार जाड गोट दिलेला आहे. तो किरीट किंवा मुकूट उत्तरोत्तर निमुळता होत गेला आहे. कपाळावरती समोरील बाजूस मोत्याच्या माळा सोडलेल्या आहेत व कपाळाच्या बरोबर मध्यभागी गोलाकार मणी किंवा कुंदन काढलेला आहे. गळ्यामध्ये हारसूत्र, हिक्कासूत्र व गुडघ्यापर्यंत लोंबकळणारी माला दाखवली आहे. दंडाला गोलाकार केयूर दाखवले आहेत. हस्तवलय व पादवलय जाड व गोलाकार दाखवलेले आहेत. नुपूर किंवा तोडेही जाडजूड दाखवले आहेत. पोटावरती नाग दाखवून त्याचा फणा समोरील बाजुस दाखवला आहे. या शिल्पाच्या डाव्या बाजूच्या पायाजवळ कोपऱ्यात उंदीर दाखवला आहे. हा उंदीर समोरुन पाहिल्यानंतर कसा दिसतो, त्याप्रमाणे काढलेला आहे.

गणपतीच्या या दोन्ही मूर्तीचे काही अवयव तोडलेले आहेत. मात्र दोन्हीतील समान रचनेमुळे दोन्हीचा आधार घेवून या मूर्तीतील सर्व घटक स्पष्ट केले आहेत. ही दोन्ही शिल्पे ज्या भिंतीला काढलेली आहेत. त्या शिल्पाच्या वरती मंदिराच्या शिखराच्या बाह्यभागाची रचना काढलेली आहे. ज्यामुळे एखाद्या देवकोष्टकात गणपतीचे शिल्प ठेवले आहे, अशा स्वरुपाचा भास होतो.

- **एकाच शिळाखंडावरील दोन गणपती :-**

श्री संगमेश्वर मदिर परीसर सुधारणा समितीला उत्खननात मिळालेल्या गणपतीच्या शिळाखंड हरिहरेश्वर मंदिराच्या पश्चिमेला असलेल्या संरक्षणात्मक भिंतीत लावलेली आहे. हा शिळाखंड ३ फूट रुंद व २ फूट रुंद या आकाराचा आहे. या शिळाखंडावर दोन गणपतीची शिल्पे कोरलेली आहेत. या गणपती शिल्पाचे उन्मान १.५ फूट व प्रमाण १.२ फूट आहे. या शिळाखंडाला खालील बाजूस गोट दिलेला आहे. ही दोन्हीही शिल्पे सर्व बाबतीत सारखी आहेत. फक्त डाव्या बाजूला वरच्या हातातील आयुध वेगळे आहे. हे शिल्प पुल्लिंगी शिळाखंडात बनवलेले आहे. ही दोन्हीही शिल्पे आसनस्थ प्रकारात आहेत. ही शिल्पे ललितासन किंवा अर्धपर्यकासन या आसनात बसलेली आहेत. ही दोन्हीही शिल्पे चर्तुभूज स्वरुपात आहेत. यातील उजवीकडील पहिला हात अभयमुद्रेत दाखवली आहे. त्यानंतरचा उजवीकडील त्याच्यावरचा दुसऱ्या हातात त्रिशूल हे आयुध दाखवले आहे. डावीकडील पहिला वरच्या हातात गोलाकार रचनेत शिवलिंग आहे. तर दुसऱ्या शिल्पात शिवलिंगाऐवजी कमलपुष्प काढलेले आढळते. हा एकमेव फरक या दोन शिल्पात आढळतो. अन्यथा इतर सर्व बाबी समान आहेत. त्यानंतर डावीकडील दुसऱ्या हातात मोदकाचे भांडे असून त्यामध्ये एकावर एक मोदक ठेवलेले आहेत. गणपतीचा चेहरा सरळ समोर दाखवून त्याची सोंड वरुनच डावीकडे वळवलेली आहे. ही सोंड वरुनच वामार्वत होवून मोदकापर्यंत परत वळवलेली आहे. ही दोन्हीही गणपतीची शिल्पे ललितासन किंवा अर्धपर्यकासनात असल्याने उजवा पाय गुडघ्यात मुडपून थोडासा बाहेर घेवून पायाचा पंजा सरळ जमिनीवर ठेवला आहे. या पायाची रचना उभ्या स्वरुपात आहे. डावा पाय आडव्या स्वरुपात असून त्याची मांडी घालून त्याच्या पंजाची बोटे समोर दिसतील अशा स्थितीत आहेत. दोन्हीही शिल्पाच्या गळ्यामध्ये कोणतेच अलंकार नाहीत. डोक्यावर किरीट किंवा मुकूट, हस्तवलय, पादवलय जाड व गोलाकार गोपच्या स्वरुपात दाखवले आहे. पायात तोडे किंवा नुपूरही दाखवले आहेत. हात व पाय यात स्थूलपणा जाणवत नाही. तसेच पोटही जास्त बेढब दाखवले नाही. पोटावरती नाग दाखवून त्याचा फणा समोरील बाजूस काढला आहे. गणपतीचे वाहन उंदीर दोन शिल्पाच्या मध्ये दाखवला आहे.

हत्तरसंग कुडलसंगम येथील शिल्पकला व वास्तुकलेवर चालुक्य होयसळांचा प्रभाव जाणवणारे अनेक घटक पाहावयास मिळतात. शिल्पकाराने विचार, नियम, जडत्व यांचा ताळमेळ ठेवून प्रतिमा आणि परिमाणे यांची जोड देऊन अप्रतिम, आकर्षक, सुडौल मूर्ती बनविल्या आहेत. या शिल्पामध्ये अधिक कल्पकता व कौशल्य प्रत्ययास आणलेले दिसते. होयसळ शैलीमध्ये मूर्तीकाम सौष्ठवपूर्ण व सफाईदार असते. त्याप्रमाणेच येथील मूर्तीकाम आढळते. या शिल्पात भरपूर दागदागिन्यांनी शिल्पे मढवून शिल्पावर दागिन्यांचा अतिरेक आणि शरीरयष्टीचा डौल पूर्णपणे झाकून टाकलेला दिसतो.

## निष्कर्ष :

- विश्वरुप शिवलिंगात ३५९ + ०१ मुख्य लिंग म्हणजे एकूण ३६० मुखलिंग आढळतात. यात काही स्थानक, आसनस्थ व मुखशिवाची शिल्पे आहेत. त्यातील एक शिल्प हरिहरचे आहे. यावरुन शैव-वैष्णव संघर्ष कमी करण्याचा प्रयत्न दिसतो.
- लक्ष्मी-भैरवीचे शिल्प एकाच शिळेवर काढून शैव-वैष्णव यांच्यातील संघर्ष कमी करण्याचा प्रयत्न दिसतो.
- येथील स्थानक गणपती शिल्पामध्ये एका हातात गदा व दुसऱ्या हातात शिवलिंग दाखविले आहे. यावरुन शैव-वैष्णव ऐक्य दाखवायचे होते, हे स्पष्ट होते.
- एकाच शिलाखंडावरील दोन गणपती शिल्पात गणपतीची आयुधे दाखवताना एका गणपतीच्या डाव्या हातात शिवलिंग तर दुसऱ्या गणपतीच्या डाव्या हातात कमलपुष्प दाखवून शैव-वैष्णव यांच्यातील संघर्ष कमी करण्याचा प्रयत्न दिसतो.
- दक्षिण भारतातील गणपती शिल्प सोंडेवरुनच वार्मावत होवून मोदक पात्रापर्यंत पोहोचते, असे गणपती शिल्प येथे आहे.
- चालुक्य, होयसळ शैलीतील उरुदाम, मुक्तदाम, कटीसूत्र इत्यादी अलंकार येथील लक्ष्मी-भैरवीच्या शिल्पावर आढळते.
- येथील गणपती शिल्प होयसळ शैलीप्रमाणे अलंकारांनी नटलेले आहे.

## संदर्भ ग्रंथ यादी :


१) Kunte B.G., Solapur District Gazzetter, Bombay, १९७७.
२) भिडे ग.ल., श्रीक्षेत्र कुडलसंगम, श्रीक्षेत्र संगमेश्वर परिसर सुधारणा समितीद्वारा प्रकाशन, हत्तरसंग कुडल, २०००.
३) कदम य.ना., समग्र भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, एप्रिल २००३.
४) जोशी महादेवशास्त्री, भारतीय संस्कृती कोश, अनमोल प्रकाशन, खंड-७, २००४.
५) भिडे ग.ल., प्राचीन भारताचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.
६) जोशी नि.पु., भारतीय मूर्तीशास्त्र, अ.अं. कुलकर्णी निमंत्रक प्रकाशन समिती, पुणे, १९७९.
७) कळसेकर टी.एल., महाराष्ट्राचे खजुराहो-खिद्रापूर, काळसेकर प्रकाशन, पुणे, १९९७.
८) प्रत्यक्ष सर्वेक्षण.